# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

**E-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**


पत्र क. : नाविमं/प.उ.मा./1113
नागपूर, दि.02/04/2025

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर.
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

**विषय :– फेब्रुवारी–मार्च 2025 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) क्रिडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे व शुल्क भरणेबाबत.**

**संदर्भ : 1) क्रिडा व युवक सेवा संचालनालय यांचे पत्र क्र.क्रीयुसे/ग्रेसगुण/ऑन.अर्ज/2024–25 का–4/3894, दि. 14 जानेवारी 2025.**
**2) या कार्यालयाचे पत्र क्र.रामं./परीक्षा–7/510, दि. 06/02/2025.**
**3) पत्र क्र. रामं./परीक्षा– 7/706/पुणे, दि. 18/02/2025 प्राप्त पत्र.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. 2 च्या पत्रान्वये फेब्रु.–मार्च 2025 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे कडून क्रिडा प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि.15/04/2025 पर्यंत स्किारण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज/प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर **URL: https://aaplesarkar.mahaonline.gov.in** या लिंकद्वारे विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे पाठविलेले आहेत.

तथापि विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले असता क्रिडा संबंधित खेळाडू विदयार्थ्यांचे सोबतचे प्रपत्र 'क' भरून, प्रपत्र प्रति विदयार्थी रू. 25/– (अक्षरी पंचवीस रूपये फक्त) शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी शुल्क प्रपत्रासह विभागीय मंडळाकडे चलनाने/Online अथवा रोखीने स्विकारण्यात येईल. याबाबत आपणांस कळविण्यात आले असता, आपण Online प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु प्रति विदयार्थी शुल्क जमा केल्याचे दिसून येत नाही. तरी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी शुल्क त्वरीत जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. जेणे करून क्रिडा प्रस्ताव तपासणे सोईचे होईल.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित
2) जिल्हा क्रिडा अधिकारी ( भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना माहितीस्तव तथा व पुढील कार्यवाहीस्तव.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,( भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.